सर ज.जी. कला शाळा आवारात कला दालन आणि संग्रहालयाचे बांधकामासाठी अभिकल्प कल्पना स्पर्धा (Idea Design Competition) घेणेबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्रशिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक : HTED-15027/8/2026-MHT-(TE-6)
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ११ मार्च, २०२६.

वाचा :- १)शासन निर्णय क्रमांक अेडीआर-२०२३/प्र.क्र. ५१/तांशि-६, दि. १९ मे, २०२३
२) कला संचालनालयाचे पत्र क्र. डिओअे-२०२५/दोन/१९५० व २५८, दि. ४ डिसेंबर, २०२५ व १० फेब्रुवारी, २०२६.
३) मुख्य अभियंता, सा.बा. प्रादेशिक विभाग, मुंबई यांचे पत्र क्र. मुअ (मुं)/का-२ /६४६ दि. १० फेब्रुवारी, २०२६.

प्रस्तावना :-

सर ज.जी. कला शाळा आवारात कला दालन व संग्रहालयाकरिता नवीन इमारत बांधण्याचे नियोजित आहे. याकरिता देशातील नामांकित वास्तुविशारदांची / वास्तुशास्त्र संस्थांची अभिकल्प कल्पना स्पर्धा (Idea Design Competition) सार्वजनिक बांधकाम विभागाकडून राबविण्यात येणार आहे. सदर अभिकल्प कल्पना स्पर्धेत सादर करण्यात येणाऱ्या डिझाईन्स मधून एक डिझाईन अंतिम करण्यासाठी समिती गठित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

त्याअनुषंगाने सर ज.जी. कला शाळा आवारात कला दालन व संग्रहालयाकरिता बांधावयाच्या इमारतीची संभाव्य रचना निश्चित करण्यासाठी देशातील नामांकित वास्तुविशारदांची / वास्तुशास्त्र संस्थांची अभिकल्प कल्पना स्पर्धा सार्वजनिक बांधकाम विभागाकडून आयोजित करण्यास मान्यता देण्यात येत आहे. या कल्पना स्पर्धेमध्ये सादर करण्यात येणाऱ्या डिझाईन्स मधून एक डिझाईन अंतिम करण्यासाठी खालील प्रमाणे निवड समिती गठित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	अधिकाऱ्याचे पदनाम	समितीमधील पदनाम
१	मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, मर्झबान पथ, मुंबई	अध्यक्ष
२	मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, सार्वजनिक बांधकाम विभाग, मर्झबान पथ, मुंबई	सदस्य
३	अधिक्षक अभियंता, मुंबई (सा.बां.) मंडळ, बांधकाम भवन, मर्झबान पथ, मुंबई	सदस्य
४	कुलगुरु, सर ज.जी. कला, वास्तुकला व अभिकल्प विद्यालय, मुंबई	सदस्य
५	संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई	सदस्य
६	प्राचार्य, सर ज.जी.वास्तुशास्त्र महाविद्यालय, मुंबई	सदस्य
७	कार्यकारी अभियंता, इमारती शहर विभाग, बांधकाम भवन, मर्झबान पथ, मुंबई	सदस्य सचिव

०२. सर ज.जी. कला शाळा आवारात कला दालन व संग्रहालयाकरिता नवीन इमारत बांधण्याच्या अनुषंगाने वरील निवड समितीपुढे अभिकल्प कल्पना स्पर्धा आयोजित करण्यात यावी. सदर स्पर्धेसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून Expression of Interest (EOI) ची कार्यवाही करण्यात यावी. तसेच, सदर अभिकल्प कल्पना स्पर्धेचे आयोजन सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने करावे.

०३. अभिकल्प कल्पना स्पर्धेसाठी निवड समितीपुढे वास्तुविशारद / वास्तुशास्त्र संस्था यांचेकडून डिझाईन्स सादर करण्यात यावीत. सदर डिझाईन्स मधून पहिला, दुसरा व तिसरा असे क्रमांक निवडण्यात यावेत. पहिल्या क्रमांकास रु.२,००,०००/- दुसऱ्या क्रमांकास रु. १,५०,०००/- व तिसऱ्या क्रमांकास रु. १,००,०००/- असे बक्षीस देण्यात यावे. सदर बक्षीसांची रक्कम सार्वजनिक बांधकाम विभागाकडून देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

०४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०३१११००३२९३०८ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by PRAVIN RAJARAM MUNDHE
Date: 2026.03.11 11:02:58 +05'30'

(प्रविण मुंढे)
अवर सचिव , महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२) मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३) अ.मु.स, उच्च व तंत्रशिक्षण यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
४) मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मर्झबान पथ, मुंबई
५) मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, सार्वजनिक बांधकाम विभाग, मर्झबान पथ, मुंबई
६) अधीक्षक अभियंता, मुंबई (सा.बा.) मंडळ,बांधकाम भवन, मर्झबान पथ, मुंबई
७) मा. महालेखापाल, मुंबई
८) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
९) निवासी लेखा अधिकारी , मुंबई
१०) संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
११) प्र. कुलसचिव, सर ज.जी. कला, वास्तुकला आणि अभिकल्प विद्यालय, मुंबई
१२) निवड नस्ती (तांशि-६)